# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/11/2021 (मंगळवार)

---

## चोरी

1) पो.स्टे. नरखेड :– फिर्यादी नामे– गणेश प्रभाकर रेवतकर, वय 39 वर्ष, रा. वडेगाव उमरी, ता. नरखेड यांची शेती मौजा मोहदी (धोत्रा) शिवारात असुन त्यांचे शेतामध्ये पाणी ओलण्याकरीता शक्ती कंपनीची मोटार मा. मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजने अंतर्गत लावलेली होती. फिर्यादीने दि. 14/11/2021 रोजी सायंकाळी 18.00 वा. सुमारास त्यांचे शेतामध्ये पाणी ओलुन घरी गेले. त्यानंतर दि. 15/11/2021 रोजी सकाळी 09/00 वा. शेतात गेले असता त्यांचे शेतातील विहीरीवर पाणी ओलण्याची मोटर किंमत 7,000/–रू. आणि कॉपर वायर अंदाजे 50 फुट किंमती 4,00/–रू. असा एकुण 7,400/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक दिनेश वरठे हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील मौजा मडासावंगी शिवार येथे दि. 22/10/2021 ते दि. 26/10/2021 चे 11.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. विनया शैलेंद्र गायकवाड, वय 41 वर्ष, रा. मडासावंगी ता. कळमेश्वर या ग्रामपंचायत मडासावंगी गावाच्या सचीव म्हणुन कामकाज पाहतात मडासावंगी शिवारातील चंद्रभागा नदीचे पाणी अडविण्यासाठी पाटबंधारे विभागाने 16 ते 17 वर्षा पुर्वी गर्बीयण बंधा–यावर एकुण 32 लोखंडी पल्ले बसविले होते. यातील नमुद घटना ता वेळी यातील ग्राम पंचयत चे उपसरपंच श्री. भोजराज टापरे हे तेथे गेले असता त्यांना 32 लोखंडी पल्ल्यांपैकी 17 लोखंडी पल्ले किं. 17,000/–रू. चा मुद्देमाल दिसले नाही अज्ञात आरोपीने सदर माल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नारायण बोरकर मो. क्र. 9823581297 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. खापा :– अंतर्गत मौजा भेंडाळा शिवार, सावनेर येथे दिनांक 15/11/2021 चे 18:30 वा. दरम्यान आरोपी अज्ञात बोलेरो पिकअप गाडीचे चालकाने आपले ताब्यातील वाहान निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून समोरून येणाऱ्या मोटरसायकल स्वार 1) मनोज पुरषोत्तम चिंचूलकर वय 25 वर्ष रा. वाकोडी व त्याचे मागे बसलेला 2) सोनु भगवानदास टेकाम, वय 27 वर्ष, रा. खमारपाणी तह सौंसर जि. छिंदवाडा यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते दोघेही गंभीर जखमी होवुन 1) मनोज पूरषोत्तम चिंचूलकर हा जागीच मरण पावला व क्र. 2) सोनु टेकाम हे गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजकुमार अन्नाजी चौधरी वय 35 वर्ष रा. वाकोडी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री चिश्तीया हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा ठाणा येथे फिर्यादीची मुलगी नामे– पुर्वी रेहपाडे वय 06 वर्ष ही आरोपी नामे– मंगेश सुरेद्र नंदुरकर रा ठाणा उमरेड यांचे घराचे जांब तोडले त्यामुळे आरोपीने तिच्या गालावर थापड मारली. दि. 15/11/2021 चे 08.00 वा. ते 08.30 वा. आरोपी हा दारू पिउन गावात आला व फिर्यादी नामे– अनिल अशोक रेहपाळे वय 35 वर्ष रा ठाणा उमरेड यांच्या आईला खर्रा खाण्यासाठी मागितला. तेव्हा फिर्यादीचे आईने 'माझ्याजवळ खर्रा नाही, मला मागु नकोस' तेव्हा आरोपीने फिर्यादीच्या आईला शिवीगाळ करून जास्त बोलशील तर मारून टाकीन अशी धमकी दिली. तेव्हा फिर्यादीने म्हटले की, 'माझ्या मुलीला का बर मारला' असे म्हणुन हटकले असता आरोपीने शिवीगाळ करून गोटा फेकुन मारला तो गोटा फिर्यादीचे डोक्याला घासुन गेला. त्यानंतर आरोपीने आपल्या घरून झिलपी घेवुन येवुन फिर्यादीच्या डोक्यावर मारले व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 336, 323, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक आनंद धात्रक मो. क्र.9421732470 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. उमरेड – दिनांक 04/11/2021 चे 09.00 वा. ते 09.30 वा. चे सुमारास पो.स्टे. उमरेड हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– आकाश विलास येसनसुरे, वय 30 वर्ष, रा. हेटी, उमरेड याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राजु डोर्लीकर मो.क्र. 8767234501 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर